राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in
Web: www.ropune.org.in

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२/ब, तिसरा मजला,तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत ,शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/पदभरती /२०२३/ 2090 दिनांक - 18 MAY 2023

प्रति,

प्राचार्य
संचालक/ प्राचार्य
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये

विषय- शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये या संस्थांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार " प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" या योजनेतंर्गत प्राध्यापकांची पदे भरणेबाबत...

संदर्भ- १.उच्च व तंत्रशिक्षण विभाग शानिक्र.संकीर्ण २०२२/प्र.क्र.(१०/२२)/तांशि-१ दिनांक २९/१२/२०२२
२.संचालनालयाचे पत्र क्र.४/आस्था/तंशिसं/२०२३/१९ दिनांक ०७/०१/२०२३
३.या कार्यालयाचे पत्र क्र.तंशिविकापु/आस्था-१/पदभरती/२०२३/६२८ दिनांक ०७/०२/२०२३
४. संचालनालयाचे पत्र क्र.४/आस्था/तंशिसं/प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस/२०२३/२८५ दिनांक १०/०५/२०२३

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने संदर्भ क्र.१ अन्वये शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये या संस्थांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार " प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" या योजनेतंर्गत प्राध्यापकांची पदे भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.२ अन्वये निर्देशित केल्याप्रमाणे, संदर्भ क्र.३ अन्वये या कार्यालयाने संबंधित शासन निर्णयातील नमूद मार्गदर्शक तत्वानुसार आपल्या संस्थेसाठी मंजूर करण्यात आलेली "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" ही पदे भरणेबाबत संस्थास्तरावर योग्य ती कार्यवाही करणेबाबत कळविलेले होते.

आता संदर्भ क्र.४ अन्वये, संचालनालयाने पुनःश्च निर्देशित केल्याप्रमाणे , संदर्भाधिन शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वे व तरतूदी विचारात घेऊन "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" ही पदे सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरीता नियुक्त करण्याबाबतची कारवाई संस्थास्तरावर करणेबाबत सुचित केलेले आहे. तरी या पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, संस्थास्तरावर नियमोचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयांस शैक्षणिक सत्र सुरु होण्यापुर्वी व्दिप्रतीत सादर करावा.

सोबत - संदर्भ क्र.४ ची छायाप्रत

(डॉ.दत्तात्रय व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४०४/४२८,
ई-मेल-desk4@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक: ४/आस्था/तंशिसं/ प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस /२०२३/२८५ दिनांक: 10 MAY 2023

महत्त्वाचे

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

**विषय:- शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये या स्थांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" या योजनेअंतर्गत प्राध्यापकांची नियुक्ती करणेबाबत...**

संदर्भ:- १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२२/प्र.क्र (१०/२२)/तांशि-१, दिनांक २९ डिसेंबर, २०२२
२) संचालनालयाचे पत्र क्र. ४/आस्था/तंशिसं/२०२३/१९, दि.०७.०१.२०२३

"राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०" अंतर्गत उद्योगक्षेत्र व अर्थव्यवस्थेची मागणी पूर्ण करण्याकरीता उच्च शिक्षणाचे कौशल्य आधारित शिक्षणामध्ये रुपांतरण करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने औद्योगिक क्षेत्रातील अनुभवी व्यवसायिकांचा शिक्षण क्षेत्रात समावेश करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" हा नवीन उपक्रम सुरू केला आहे. तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयात सद्य:स्थितीत प्राध्यापकांची बऱ्याच प्रमाणात पदे रिक्त आहेत. यास्तव, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र संस्थांतील मंजूर पदांच्या १०% च्या प्रमाणात "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" यांची नियुक्ती करण्यास शासनाने संदर्भाधिन क्र. १ वरील शासन निर्णयान्वये मंजूरी दिली असल्याचे, संचालनायाचे संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये आपणांस कळविण्यात आले होते.

तरी आता याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, संदर्भाधिन शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वे व तरतूदी विचारात घेऊन शासन निर्णया सोबतच्या यादीतील आपल्या विभागातंर्गत येणाऱ्या शासकीय व अशासकीय

अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांना त्यांना मंजूर करण्यात आलेली "प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस" ही पदे सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरीता नियुक्ती करण्याबाबतची कार्यवाही संबंधित संस्थांकडून करवून घ्यावी व कार्यवाही पुर्ण झाल्याबाबतचा पूर्तता अहवाल या संचालनालयास शैक्षणिक सत्र सुरु होण्यापुर्वी सादर करावा.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत: माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव...

१. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी
२. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड
३. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव
४. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद
५. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती
६. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ
७. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर
८. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर
९. शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड
१०. संचालक, वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई-४०००१९.
११. संचालक, श्री.गुरु गोविंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६.